महाराष्ट्र अभियांत्रिकी **(स्थापत्य) सेवा वर्ग-१ (गट-अ) मधील सन २०१० मध्ये नियुक्त झालेल्या सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) यांचा परिवीक्षा कालावधी समाप्त करणेबाबत......**

# महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक :- परिवी-२०२२/(प्र.क्र.३२/२२)/आ(संनि),

तिसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- २३ जून, २०२२

वाचा -

१) शा.नि.क्र.नियुक्ती-१०१०/(प्र.क्र.७१/२०१०)/आ(संनि) , दिनांक १२.०८.२०१०

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परिवि-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दिनांक २५.०८.२०१५

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक १२७७/XVII , दि.०२.१२.१९८०.

## शासन निर्णय

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णय दि. १२.०८.२०१० अन्वये महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-१ मध्ये खालील नमूद उमेदवारांची सहायक अभियंता श्रेणी-१ ( स्थापत्य ) (गट-अ) या पदावर दोन वर्षाकरिता परिवीक्षाधीन उमेदवार म्हणून नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२. खाली नमूद सहायक अभियंता श्रेणी-१ ( स्थापत्य ) (गट-अ) यांनी परिवीक्षा कालावधी पूर्ण करण्यासाठी आवश्यक अटी व शर्ती समाधानकारकरित्या पूर्ण केल्या आहेत. संबंधितांविरुध्द शासन स्तरावर विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही या अटीच्या अधीन राहून संबंधितांचा परिवीक्षा कालावधी त्यांच्या नावासमोर रकाना क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या दिनांकास समाप्त करण्यात येऊन संबंधितांची सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य), गट-अ या पदावरील सेवा पुढे सुरू ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) यांचे नाव | शासन सेवेत रूजू झाल्याचा दिनांक | व्यावसायिक परीक्षेचा कालावधी | घेतलेली रजा (एकूण दिवस) | परिवीक्षा कालावधी संपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री.प्रणव रघुनाथ मुदगल | दि.०१.०९.२०१० | दि.११.०२.२०१९ ते दि.१३.०२.२०१९ | ४३ दिवस | दि.१४.०२.२०१९ (म.पू.) व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर परीक्षा संपल्याच्या दिनांकानंतरच्या दिवशी परिवीक्षाधीन कालावधी समाप्त |

३. सदर शासन निर्णय संदर्भांकित क्र.२ येथील शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक परिवि-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दि.२५.०८.२०१५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारांनुसार तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीनुसार व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१३८/का.८, दिनांक २३.०६.२०२२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(बापूसाहेब रा. सोनवणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) महालेखापाल-१/२, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर.

२) अधीक्षक अभियंता व सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक.

३) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई.

४) श्री.प्रणव रघुनाथ मुदगल, सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य)
द्वारा : मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई.

५) कार्यासन आ (वर्ग-१)/आ (वर्ग-२)/गोपनीय कार्यासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

६) आ (संनि), कार्यासन संग्रहार्थ.